**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE**
Official Publication of Sant Gadge Baba Amravati University
PART - TWO

गुरूवार, दिनांक ३ सप्टेंबर, २०१५

## अधिसुचना

क्रमांक : १२६/२०१५ दिनांक : ०३/०९/२०१५

**विषय : अभ्यासक्रमांचे संलग्नीकरण Withdraw करण्याबाबत ...**

सर्व संबंधितांचे माहितीकरीता अधिसूचित करण्यात येते की, आबासाहेब पारवेकर कला, वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ या महाविद्यालयातील बी.ए.(आवश्यक उर्दु) या विषयाचे संलग्नीकरणाबाबत महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने सभा दि. ०१.०४.२०१५ मध्ये बाब क्र. ११ अन्वये हा विषय बंद करण्याच्या केलेल्या शिफारशीस विद्वत्त परिषद सभा दिनांक २८.०४.२०१५ मध्ये विषय क्र. १३ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

त्याअनुषंगाने विद्वत्त परिषदेच्या निर्णयानुसार आबासाहेब पारवेकर कला, वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ या महाविद्यालयातील बी.ए.( आवश्यक उर्दु) या विषयाचे संलग्नीकरण महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ९१ नुसार Withdraw करण्यात येत आहे.

आदेशान्वये -

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

## अधिसूचना

क्र. १२७/२०१५ दिनांक - ३.९.२०१५

**विषय : विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांच्या/मंडळांच्या निवडणूका पुढे ढकलण्याबाबत.**

महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र विद्यापीठे (विद्यापीठ प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणूका तात्पूरत्या पुढे ढकलणे) अधिनियम क्रमांक २९/२०१५, शासनाच्या असाधारण राजपत्र भाग क्र. ८ मध्ये दिनांक १७.०८.२०१५ रोजी प्रसृत केला असून, सदर अधिनियमान्वये सर्व अकृषि विद्यापीठातील विविध प्राधिकरणे व इतर मंडळांच्या निवडणूका दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ पर्यंत पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

उपरोल्लेखित अधिनियमातील तरतूदीनुसार, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता अधिसूचीत करण्यात येते की, विद्यापीठातील विविध प्राधिकरणांच्या/मंडळांच्या निवडणूका दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ पर्यंत पुढे ढकलण्यात येत असून, अधिसभा निवडणूक-२०१५ अंतर्गत नोंदणीकृत पदवीधर म्हणून नांव नोंदणी करण्याकरीता विद्यापीठाने अधिसूचना क्र. ३०/२०१५, दिनांक ६.४.२०१५ अन्वये सुरू करण्यात आलेली प्रक्रिया पुढील आदेशापर्यंत स्थगीत ठेवण्यात येत आहे.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

# अधिसूचना

क्रमांक : १२८/ २०१५ दिनांक : ३ /०९/२०१५

**विषय : परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारण्याच्या सुधारीत तारखांबाबत..**
**हिवाळी - २०१५ परीक्षा (नियमित महाविद्यालयीन विद्यार्थी)**

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता सूचित करण्यात येते की, हिवाळी- २०१५ परीक्षेकरीता प्रवेशित होऊ इच्छिणाऱ्या व परीक्षेस पात्र असणाऱ्या नियमित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरीता परीक्षा आवेदनपत्रे स्विकारण्याच्या / सादर करावयाच्या तारखा अधिसूचना क्रमांक ४९/२०१५ नुसार जाहीर करण्यात आल्या होत्या. तथापी परीक्षा आवेदनपत्रे सादर करण्याच्या सदर तारखांच्या वेळापत्रकात बदल करण्यात येत असुन नियमित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरीता परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारण्याच्या / सादर करावयाच्या सुधारीत तारखा खालील प्रमाणे जाहीर करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | परीक्षेचे नांव / विद्याशाखेचे नांव | आवश्यक त्या शुल्कासह | | आवश्यक शुल्क अ विहीत केलेल्या विलंब शुल्कासह | |
|---|---|---|---|---|---|
| | | महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून परीक्षा आवेदनपत्रे स्विकारावयाची तारीख | महाविद्यालयाने विद्यापीठात सादर करावयाची तारीख | महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून परीक्षा आवेदनपत्रे स्विकारावयाची तारीख | महाविद्यालयाने विद्यापीठात सादर करावयाची तारीख |
| अ. | **सर्व पदवी / पदव्युत्तर / पदविका सत्र पद्धती अभ्यासक्रमाच्या परीक्षा** M.J.M.C., PGDSR, B.Sc., B.C.A., B.Pharm., M.Pharm., M.P.Ed., M.Sc., M.B.A., M.Com., MCM, M.H.R.D., PGDCM, BFD, M.Tech. (Cosmetics), P.G.Dip. In Web Tech. & Adv. Multimedia, P.G.Dip.In Biodiversity, P.G.Diploma in Watershed Tech.& Management, P.G.Diploma in Ground Water Exploration & Watershed Management, P.G. Diploma in Non-Conventional Energy System, LL.B. (Three & Five Years), LL.M., All Semester Pattern Exams, C.Lib. | **०५/०९/२०१५** | **११/०९/२०१५** | **१६/०९/२०१५** | **२३/०९/२०१५** |
| ब. | अभियांत्रिकी व तांत्रिकी विद्याशाखेतील सेमिस्टर पॅटर्न अभ्यासक्रमाच्या सर्व स्नातक परीक्षा, M.Sc.(Applied Electronics), M.C.A., P.G.Diploma in Computer Science. | **०५/०९/२०१५** | **११/०९/२०१५** | **१६/०९/२०१५** | **२३/०९/२०१५** |
| क. | अभियांत्रिकी व तांत्रिकी विद्याशाखेतील पदव्युत्तर (M.E., M.Tech.) परीक्षा. | **१८/०९/२०१५** | **२५/०९/२०१५** | **२८/०९/२०१५** | **०५/१०/२०१५** |

**महत्वाच्या सूचना :**

१. विद्यापीठ / शासन स्तरावरील प्रवेश प्रक्रियेतील विलंबामुळे ज्या परीक्षांचे प्रवेश वरील नमूद केलेल्या तारखांपूर्वी होवू शकले नाहीत अशा प्रवेशित नियमित विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे त्यांचे प्रवेशाचे तारखेपासून दहा दिवसापर्यंत विद्यापीठात सादर करावीत.

२. उपरोक्त परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारावयाच्या / सादर करावयाच्या अंतिम तारखेला महाविद्यालय / विद्यापीठ कार्यालयास सुटी असल्यास सदर तारखेनंतर येणारी कार्यालयीन कामकाजाची तारीख ग्राह्य धरण्यात यावी.

३. उन्हाळी २०१५ व त्यापूर्वीच्या परीक्षेतील अनुत्तीर्ण माजी (Ex-students) विद्यार्थ्यांनी तसेच बहीःशाल (External) वर्गवारीतील विद्यार्थ्यांनी हिवाळी २०१५ परीक्षेकरीता परीक्षा आवेदनपत्रे, अधिसूचना क्रमांक ८७/२०१२, दिनांक २८/०६/२०१२ नुसार प्रसिद्ध झालेल्या तारखांनुसार विद्यापीठात सादर करावीत.

४. अध्यादेश क्रमांक २१/२००१ नुसार सर्व संलग्नित महाविद्यालयांनी माजी व बहीःशाल विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे स्विकारणे अनिवार्य आहे.

**मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये.**

स्वा/-
परीक्षा नियंत्रक,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.